# महाराष्ट्राचे स्थान

- स्वातंत्रोत्तर काळात १९५६ मध्ये देशात भाषावर प्रांत रचनेनुसार राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. त्यानुसार आंध्रप्रदेश हे भाषिक तत्वावर आधारित पहिले राज्य अस्तित्वात आले. याच पुनर्रचनेनुसार राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. याच पुनर्रचनेने हैद्राबाद संस्थानातील मराठी भाषिक पाच जिल्हे (औरंगाबाद, बीड, परभणी, उस्मानाबाद, नांदेड) व मध्य प्रांतातील विदर्भाचे मराठी भाषिक आठ जिल्हे ( बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, यवतमाळ, चांदा) व बॉम्बे प्रेसिडेंसिमधील १३ जिल्हे असे २६ जिल्हे आणि गुजरात यांचे मिळून १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्वैभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाली. परंतु मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य असावे अशी मागणी असल्यामुळे तत्कालीन द्वैभाषिक राज्यामध्ये आंदोलने झाली. सरतेशेवटी राज्यातील १०६ हुतात्म्यांच्या बलिदानानंतर मराठी भाषिकांकरिता गुजरात वगळता २६ जिल्हे असणारे महाराष्ट्र हे स्वतंत्र राज्य १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले.

| राज्य | नवीन राज्यांची मागणी | राज्य | नवीन राज्यांची मागणी |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | विदर्भ | आसाम | बोडोलँड |
| पश्चिम बंगाल | गोरखालँड | गुजरात | सौराष्ट्र |
| उत्तरप्रदेश | अवध, हरित प्रदेश | मणिपूर | कुकीलँड |
| बिहार आणि झारखंड | मिथिलांचल | | |

- उत्तर व पूर्व गोलार्धात भारत हे एक राष्ट्र असून उत्तरपूर्व गोलार्धात असणाऱ्या आशिया खंडातील एक प्रमुख देश आहे. आशिया खंडातील भारताने व्यापलेल्या हिमालयापासून ते हिंदी महासागरापर्यंतच्या भागास भारतीय उपखंड असे म्हणतात. भारतीय उपखंडात भारताबरोबरच पाकिस्तान, भूतान, नेपाळ, बांगलादेश व श्रीलंका यांचा समावेश होतो.

- भारताच्या या विशाल भूमीची प्रशासकीय व राजकीय विभागणी हि २९ राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेशात झालेली आहे.
- भारतात असणाऱ्या २९ राज्यांपैकी एक प्रमुख राज्य म्हणजे महाराष्ट्र होय. महाराष्ट्र हे भौगोलिकदृष्ट्या भारताच्या साधारणतः पश्चिम मध्यवर्ती भागात असून उत्तर भारत व दक्षिण भारत यांना जोडणारी विशाल भूमी म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख करता येईल.
- महाराष्ट्र हे भौगोलिकदृष्ट्या प्राचीन गोंदवनाचा भाग असून या राज्यास फार मोठी ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक परंपरा आहे. महाराष्ट्र हे आजही भारतातील एक महत्वाचे औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य आहे.
- स्थान – १५.८ उत्तर ते २२.१ उत्तर अक्षांश , ७२.३६ पुर्व ते – ८०.९ पुर्व रेखांश दरम्यान.
- क्षेत्रफळ – ३.०७,७१३ चौ.कि.मी.
- महाराष्ट्र देशाच्या ९.३६% क्षेत्रफळाने व्यापलेला आहे.
- लांबी – पुर्व पश्चिम लांबी ८०० कि.मी. व
- रुंदी – उत्तर दक्षिण ७०० कि.मी. आहे.
- किनारपट्टीची लांबी – ७२० कि.मी.
- एकूण क्षेत्रफ़ल :- ३,०७,७१३ चौ. किमी
- क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा भारतात राजस्थान व मध्य प्रदेश नंतर तीसरा क्रमांक लागतो.

## ❖महाराष्ट्र (प्रशासकीय विभाग):

### ➢प्रशासकीय संरचना :

- महसूली विभाग – ६
- जिल्हे – ३६
- तालुके – ३५५
- बांद्रा , अँधेरी , बोरीवली, या तीन नगरी मिळून ३५८ तालुके आहेत.

### ➢लोकसंख्या :-

- एकूण लोकसंख्या – ११,२३,७३००० (अकरा कोटि तेविस लाख त्र्यहत्तर हज़ार)
- घनता – ३६५/चौ. किमी

- साक्षरता – ८२.९%
- स्त्री / -पुरुष – ९२५ / १०००
- नागरी लोकसंख्या – ४५. २ %


## ➢स्थूल राज्य उत्पादन :

- औद्योगिक व सेवा – ८७%
- कृषि संलग्नित – १३%
- वनक्षेत्र – ६१,९३९ किमी

## ➢वाहतूक :

- एकूण रेलवेमार्ग – ५९८४ किमी
- एकूण रस्ते – २,४१,७१२ किमी

## ❖सीमा रेषा :






## ➢राज्यातील काही भागांतील वैशिष्ट्य पुर्ण नावे

- सह्याद्रीच्या पश्चिमेकडचा सखल प्रदेश –कोकण
- कोकणाचे प्राचीन नाव – अपरांत
- सह्याद्रीच्या पायथ्यालगतचा कोकणाचा भाग – तळ
- कोकणसह्याद्री माथा तसेच त्याच्या लगतचा पूर्वेकडील भाग – मावळ
- सह्याद्रीच्या पुर्वेकडील पठाराचा पश्चिम भाग – देश
- औरंगाबाद विभागातील आठ जिल्हे – मराठवाडा
- विदर्भाचा पुर्व भाग – झाडी
- मध्य व पश्चिम भाग – व-हाड.
- पुणे विभागातील जिल्हे व नाशिक आणि अहदनगर मुळे बनणारा भाग – पश्चिम महाराष्ट्
- जळगांव धुळे नंदुरबार मिळून बनणारा भाग – (तापी खोरे) – खानदेश

## ➢नैसर्गिक सीमा :

- वायव्येस सातमाळा डोंगररांगा, गाळण टेकड्या व सातपुडा पर्वतातील आक्रणी टेकड्या आहेत.
- उत्तेरस सातपुडा पर्वत, त्याच्या पूर्वेस गाविलगड टेकड्या आहेत.
- ईशान्येस दरकेसा टेकड्या व पूर्वेस चिरोल टेकड्या आणि भामरागड डोंगर आहे.
- पश्चिमेस अरबी समुद्र असून राज्याची किनारपट्टी उत्तेरकडील दमण गंगा नदीपासून दक्षिणेकडे तेरेखोल खाडीपर्यंत पसरलेली आहे.

## ➢राजकीय सीमा :

- महाराष्ट्राला एकूण ६ राज्यांच्या सीमा स्पर्श करतात. यापैकी सर्वाधिक लांब सीमा मध्य प्रदेशबरोबर असून सर्वात कमी सिमा गोवा या राज्याबरोबर आहे. तसेच दादरा नगर हवेली ह्या केंद्रशासित प्रदेशात सिमा लागते.
- वायव्य गुजरात- ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार
- उत्तर मध्यप्रदेश – नंदुरबार, धुळे, जळगाव, बुलढाणा, अमरावती, नागपूर, भंडारा व गोंदिया

- पुर्व छत्तीसगढ – गोंदिया व गढचिरोली
- आग्नेय आंध्रप्रदेश – गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, नांदेड
- दक्षिण कर्नाटक – नांदेड, लातूर, उस्मानाबाद,सोलापूर, सांगली, कोल्हापूर,सिंधुदुर्ग
- दक्षिण गोवा – सिंधुदुर्ग
- महाराष्ट्रातील एकूण २० जिल्ह्यांची सीमा इतर राज्यांना लागून आहे. महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांची सीमा इतर कोणत्याही राज्यांना लागून नाही.
- **राज्य व राज्यांना लागून असणारी जिल्ह्यांची संख्या :**
  - ✓ **मध्य प्रदेश - ८**
  - ✓ **कर्नाटक - ७**
  - ✓ **गुजरात - ४**
  - ✓ **तेलंगणा - ४**
  - ✓ **छत्तीसगड - २**
  - ✓ **गोवा – १**

| सलग दोन राज्यांना लागून असणारी जिल्ह्यांची सीमा | | |
|---|---|---|
| 1) | नंदुरबार | गुजरात व मध्य प्रदेश |
| 2) | धुळे | गुजरात व मध्य प्रदेश |
| 3) | गोंदिया | मध्य प्रदेश व छत्तीसगड |
| 4) | गडचिरोली | छत्तीसगड व तेलंगणा |
| 5) | नांदेड | तेलंगणा व कर्नाटक |
| 6) | सिंधुदुर्ग | गोवा व कर्नाटक |
| 7) | पालघर | दादर व नगर हवेली व गुजरात |

## ➢स्थानिक स्वराज्य संस्था :-

- जिल्हा परिषदा – ३४
- पंचायत समिति – ३५१
- ग्राम पंचायती – २७,९०६
- महानगरपालिका – २६
- नगर परिषदा – २१९

## ❖महाराष्ट्रातील जिल्ह्यांबद्दल माहिती :

- सन १९५१ मध्ये मुंबई राज्यात २८ जिल्हे होते . यात गुजरात व महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांचा समावेश होता .

| १ मे १९६० रोजी महाराष्ट्रात एकूण २६ जिल्हे होते. नंतर १० जिल्हे अस्तित्वात आले . | | | |
|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | १ मे १९८१ | रत्नागिरी मधून |
| २ | जालना | १ मे १९८१ | औरंगाबाद मधून |
| ३ | लातूर | १६ ऑगस्ट १९८२ | उस्मानाबाद मधून |
| ४ | गडचिरोली | २६ ऑगस्ट १९८२ | चंद्रपुर मधून |
| ५ | मुंबई उपनगर | १९९० | मुंबई मधून |
| ६ | नंदुरबार | १ जुलै १९९८ | धुळे मधून |
| ७ | वाशीम | १ जुलै १९९८ | अकोला मधून |
| ८ | हिंगोली | १ मे १९९८ | परभणी मधून |
| ९ | गोंदिया | १ मे १९९९ | भंडारा मधून |
| १० | पालघर | २ ऑगस्ट २०१४ | ठाणे मधून |

## सरहदीना लागून असणारे जिल्हे

| राज्य | जिल्हे |
|---|---|
| गुजरात | १.पालघर २.नाशिक ३.धुळे ४.नंदुरबार |
| मध्य प्रदेश | १.नंदुरबार २.धुळे ३.जळगाव ४.बुलढाणा ५.अमरावती ६.नागपूर ७.भंडारा ८.गोंदिया |
| छत्तीसगड | १.गोंदिया २.गडचिरोली |
| तेलंगाना | १. गडचिरोली २.चंद्रपूर ३.यवतमाळ ४.नांदेड |
| कर्नाटक | १.सिंधुदुर्ग २.कोल्हापूर ३.सांगली ४.सोलापूर ५.उस्मानाबाद ६.लातूर ७.नांदेड |
| गोवा | सिंधुदुर्ग |

### ➢ क्षेत्रफळानुसार पाच मोठे जिल्हे :-

१. अहमदनगर – १७०४८ किमी
२. पुणे – १५६४३ किमी
३. नाशिक – १५५३० किमी
४. सोलापूर – १४८९५ किमी
५. गडचिरोली – १४४१२ किमी

### ➢ क्षेत्रफळानुसार पाच लहान जिल्हे :-

१. मुंबई शहर – १५७ किमी
२. मुंबई उपनगर – ४४६ किमी
३. भंडारा – ३८९५ किमी
४. हिंगोली – ४५२४ किमी
५. नंदुरबार – ५०३४ किमी

## ➢प्रशासकीय विभाग व त्यांचे क्षेत्रफळ (उतरता क्रम):-

१. औरंगाबाद – ६४८१३ किमी

२. नाशिक – ५७४९३ किमी

३. पुणे – ५७२७५ किमी

४. नागपूर – ५१३७७ किमी

५. अमरावती – ४६०२७ किमी

६. कोंकण – ३०७२९ किमी

## ➢प्रशासकीय विभाग व त्यातील तालुके (उतरता क्रम):-

१. औरंगाबाद – ७६

२. नागपूर – ६४

३. पुणे – ५८

४. अमरावती – ५६

५. नाशिक – ५४

६. कोंकण -५०

### प्रशासकीय विभाग व जिल्हे

| प्रशासकीय विभाग | जिल्हे |
|---|---|
| औरंगाबाद | १.औरंगाबाद २.लातूर ३.बीड ४.उस्मानाबाद ५.परभणी ६.हिंगोली ७.नांदेड ८.जालना |
| कोकण | १.मुंबई शहर २.मुंबई उपनगर ३.ठाणे ४.पालघर ५.रायगड ६. रत्नागिरी ७.सिंधुदुर्ग |
| पुणे | १.पुणे २.कोल्हापुर ३.सातारा ४.सांगली ५.सोलापूर |
| नाशिक | १.नाशिक २.धुळे ३.अहमदनगर ४.जळगाव ५.नंदुरबार |
| अमरावती | १.बुलढाणा २.अमरावती ३.वाशीम ४.यवतमाळ ५.अकोला |
| नागपूर | १.नागपूर २.भंडारा ३.गोंदिया ४.चंद्रपूर ५.गडचिरोली ६.वर्धा |

# ❖महाराष्ट्राचे प्रादेशिक विभाग :

- महाराष्ट्राचे एकूण ५ प्रादेशिक विभाग आहेत.

| विभाग व क्षेत्रफळ (चौ. कि. मी.) | जिल्ह्यांची संख्या | तालुक्यांची संख्या |
|---|---|---|
| कोकण (मुंबई) | 7 | 50 |
| पश्चिम महाराष्ट्र (पुणे) | 7 | 87 |
| खानदेश (जळगाव) | 3 | 25 |
| मराठवाडा (औरंगाबाद) | 8 | 76 |
| विदर्भ (नागपूर) | 11 | 120 |



## जिल्हा व जिल्ह्यातील सारख्या नावाचे तालुके

| | |
|---|---|
| 1) | पुणे – खेड, रत्नागिरी – खेड |
| 2) | अहमदनगर – कर्जत, रायगड – कर्जत |
| 3) | यवतमाळ – कळंब, उस्मानाबाद – कळंब |
| 4) | नाशिक – मालेगाव, वाशीम – मालेगाव |
| 5) | नाशिक – नांदगाव, अमरावती – नांदगाव (खंडेश्वर) |
| 6) | परभणी – सेलू, वर्धा – सेलू |
| 7) | वर्धा – कारंजा, वाशीम – कारंजा |
| 8) | पुणे – शिरूर, बीड – शिरूर (कासार) |

## ❖महाराष्ट्र नागरी प्रशासन :

- राज्यातील शहरी भागाचा विकास करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने नागरविकासखाते विकसित केले असून, त्याद्वारे महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती यांची स्थापना करण्यात आलेली आहे.

### १. महानगरपालिका

- राज्यात तीन लाख लोकसंख्येकरिता महानगरपालिका स्थापन करण्यात येते व या महानगरपालिकांचा कारभार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ यानुसार चालतो. बृहन्मुंबई महानगरपालिकेकरिता मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८. राज्यात सध्यस्थितीत २६ महानगरपालिका असून बृहन्मुंबई महापालिका ही सर्वात मोठी महानगरपालिका आहे.

| विभागनिहाय महानगरपालिका पुढीलप्रमाणे | | |
|---|---|---|
| **विभाग** | **मनपा संख्या** | **महापालिका** |
| नागपूर | 2 | नागपूर, चंद्रपूर |
| अमरावती | 2 | अमरावती, अकोला |
| औरंगाबाद | 4 | औरंगाबाद, परभणी, लातूर, नांदेड – वाघाळा |
| पुणे | 5 | पुणे, पिंपरी -चिंचवड, सांगली -मिरज – कुपवाडा, सोलापूर, कोल्हापूर |
| नाशिक | 5 | नाशिक, अहमदनगर, मालेगाव, धुळे, जळगाव |
| मुंबई (कोकण) | 9 | बृहन्मुंबई, ठाणे, मीरा - भाईंदर, कल्याण – डोंबिवली, नवी मुंबई, वसई – विरार, उल्हासनगर, भिवंडी, पनवेल |

- राज्यातील २७ वी व कोकण विभागातील ९ वी महापालिका रायगड जिल्ह्यातील पनवेल येथे नव्याने स्थापन करण्यात आली आहे.

## 2. नगरपालिका :

- राज्यात सद्यस्थितीत २३४ नगरपालिका व १२४ नगरपंचायती असून त्यांचा कारभार महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक अधिनियम १९६५ नुसार चालतो. राज्यातील नगरपालिकांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात येते.
- नागरपरिषदांचे वर्गीकरण लोकसंख्यानिहाय करण्यात येते.

## 3. कटक मंडळे :

- लष्कराची छावणी असलेल्या ठिकाणी कटक मंडळे स्थापन केली जातात. तेथील प्रशासन लष्कराच्या प्रशासकाद्वारे (कटक मंडळ कायदा १९२४ नुसार ) बघितले जातात. सध्यस्थितीत भारतात असणाऱ्या ६२ कटक मंडळांपैकी महाराष्ट्रातील कटक मंडळांची संख्या ७ आहेत.

| जिल्हा | कटकमंडळे |
|---|---|
| अहमदनगर | अहमदनगर कॅंटोन्मेंट बोर्ड |
| औरंगाबाद | औरंगाबाद कॅंटोन्मेंट बोर्ड |
| पुणे | देहू रोड, खडकी, पुणे |
| नाशिक | देवळाली |
| नागपूर | कामठी |

## ❖महाराष्ट्र ग्रामीण प्रशासन :

- महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील प्रशासनासाठी महाराष्ट्राने त्रिस्तरीय रचनेचा स्वीकार केलेला असून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार राज्यातील ग्रामीण प्रशासनाचे कामकाज चालते.

### 1) जिल्हा परिषद :

- त्रिस्तरीय रचनेतील सर्वोच म्हणजेच जिल्हास्तरावर अस्तित्वात असणारी ग्रामीण प्रशासनातील प्रमुख संस्था. महाराष्ट्रात सध्यस्थितीत मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून एकूण ३४ जिल्हा परिषद अस्तित्वात आहे.

### 2) पंचायत समिती : ३५१

### 3) ग्राम पंचायती\: २८,३३२ (खेडेगावांची संख्या : ४३,६६३)

## ❖इतर माहिती :

- लोकसंख्येनुसार देशात महाराष्ट्राचा  दुसरा क्रमांक लागतो.
- १. उत्तर प्रदेश (१९. ९६ कोटी )

- पशुधन आणि कुक्कुट पालनामध्ये राज्य देशात सहावे आहे.
- महाराष्ट्र हे देशातील सर्वात जास्त औद्योगिकरण झालेले राज्य आहे.
- राज्याचा मानव विकास निर्देशांक – ०. ५७२ (देशात पाचवा क्रमांक १.केरळ २.दिली ३.गोवा ४.पंजाब)
- राज्याच्या वायव्येस असणारा केंद्रशासित प्रदेश – दादरा व नगरहवेली
- दोन राज्यांना संलग्न आसणारे जिल्हे – धुळे, नंदुरबार, गोंदिया, गडचिरोली, नांदेड, सिंधुदुर्ग
- राज्य स्थापनेच्या वेळी असणारे जिल्हे व प्रशासकीय विभाग – २६ व ४
- महाराष्ट्रात असणारे एकून जिल्हे व तालुके – ३६ व ३५७
- क्षेत्रफळाने सर्वात मोठा जिल्हा – अहमदनगर
- क्षेत्रफळाने सर्वात लहान जिल्हा – मुंबई
- महाराष्ट्रातील सर्वात पुर्वेकडील जिल्हा – गडचिरोली
- सर्वाधिक उत्तरेकडच्या जिल्हा – नंदुरबार
- सर्वाधिक दक्षिणेकडचा जिल्हा – सिंधुदुर्ग
- महाराष्ट्रातील सर्वाधिक पश्चिमेकडचा जिल्हा – ठाणे
- सर्वाधिक जिल्ह्यांसोबत सिमा असणारा जिल्हा – अहमदनगर (एकूण सात जिल्ह्यांत)

★★★★★